# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २३० वा ❑ बुधवार दि.०५ नोव्हेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## महिला आयोग महिलांसाठी की राजकारणासाठी?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

संपूर्ण राज्यासह देशाचे लक्ष वेधून घेणाऱ्या डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरण सरकारनेही गांभीर्याने घेतले आहे. डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येनंतर सर्वत्र जोरदार काहुर उठले. या आत्महत्या प्रकरणात दोघांना यापूर्वी अटक करण्यात आली आहे. मात्र, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या विरोधात विरोधी पक्षाने जोरदार राळ उठवली आहे.फडणवीस यांनी फलटण येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमामध्ये रणजितसिंह यांना 'क्लीन चिट' दिली होती. त्यानंतरही विरोधकांचे आरोप चालूच राहिले. या परिस्थितीमध्ये भाजपच्या माजी खासदारांभोवतीच 'चक्रव्यूह' रचल्याचे समोर आले. स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीची मागणी सातत्याने होत होती. त्याची दखल घेत फडणवीस यांनी एसआयटीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे.

**कुटुंबाकडून गंभीर आरोप**

मृत डॉक्टरांनी केलेल्या एका कथित अर्जात एका खासदाराच्या पीएचा उल्लेख आहे. हा पीए फोनवरून बोलताना अनेकदा खासदार बोलत असल्याचे सांगायचा. तसेच रिपोर्ट बदलण्याबाबत दबाव टाकत असे, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यामुळे हे प्रकरण राजकीय दबावाखाली असल्याचे आरोप कुटुंबाकडून केला जात आहे.

या आत्महत्या प्रकरणावर महिला आयोगाची भूमिका मात्र वादात सापडली आहे. महिला आयोग प्रामुख्याने महिलांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सामाजिक, कायदेशीर न्यायासाठी काम करतो, राजकारणासाठी नाही. मात्र डॉ संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात राज्य महिला आयोगाने डॉ संपदा मुंडे यांच्या चरित्रावर शिंतोडे उडवून या प्रकरणातील आरोपींना वाचविण्याचा गंभीर प्रकार केलेला आहे. महिला आयोगाची मुख्य भूमिका महिलांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या समस्यांसाठी आवाज उठवणे ही आहे. तथापि, काहीवेळा आयोगाच्या कार्यपद्धतीवर आणि निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे केले जाते. अनेकदा हे आरोप केले जातात की आयोग राजकीय दबावाखाली काम करते आणि महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती भूमिका घेत नाही, असेही अनेकदा समोर आले आहे.

महिलांच्या हक्कांचे रक्षण करणे किंवा छळाशी संबंधित कोणत्याही तक्रारीचे निराकरण करणे हे आयोगाचे मुख्य काम आहे. महिलांसाठी कायदेशीर सुरक्षा उपायांचा आढावा घेणे आणि आवश्यकतेनुसार कायदेमंडळाला शिफारशी करणे. गरजू महिलांना समुपदेशन आणि मोफत कायदेशीर सल्ला देणे.

महिलांसाठी कायदे साक्षरता कार्यशाळा आयोजित करणे आणि प्रसारमाध्यमांमधून महिलांच्या प्रतिमेबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे.आणि महिलांच्या हिताच्या धोरणात्मक बाबींवर सरकारला सल्ला देणे.अशी भूमिका महिला आयोगाची असते.मात्र डॉ संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणावर महिला आयोगाची भूमिका मात्र संशयातीत आहे.

महिला आयोगाने महिलांना न्याय देण्याचे काम केले पाहिजे. पण महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर सरकारची बाजू मांडत आहेत, आरोपीचा बचाव करत आहेत. चाकणकर पीडित मुलीच्या घरी गेल्या नाहीत. त्यांची विचापूर केली नाही पण पोलीस स्टेशनला जाऊन त्यांची वकिली केली आणि सर्वात लाजिरवाणी बाब म्हणजे त्यांनी डॉ. संपदा मुंडे यांचे चारित्रहनन

फेब्रुवारीपासून डॉक्टरला त्या ठिकाणी त्रास होता. आणि त्याची तक्रार देखील तिने केली होती. सामूहिक कट करून ही हत्या करण्यात आली, असा आरोप होत आहे.महिला आयोगाने मृत डॉक्टरच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले, हे प्रकरण दडपण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान या प्रकरणात राजकीय व्यक्तीचे लागेबांधे, पोलीस अधिकाऱ्यांची कथित भूमिका आणि तपासात होणारा विलंब पाहता, प्रशासनावर तातडीने कठोर कारवाई करण्याचा दबाव वाढत आहे. बीडच्या महिला डॉक्टरला न्याय मिळवून देण्यासाठी आणि या प्रकरणाचे संपूर्ण सत्य समोर आणण्यासाठी सखोल चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे.या सर्व प्रकारात डॉ संपदा मुंडे यांना न्याय मिळेल काय? या प्रकरणाची वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली एसआयटी स्थापन करण्याचे आदेश पोलिस महासंचालकांना सरकारने दिले आहेत.

# वाचनानंदाची दिवाळी; शासकीय विभागीय ग्रंथालयात दिवाळी अंक प्रदर्शन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** दिवाळी अंक म्हणजे महाराष्ट्राच्या वाचन संस्कृतीचे वैशिष्ट्य. दिवाळीचा खमंग फराळ, आकाशदिवे, फटाके, फुलबाज्या, आप्तेष्टांच्या भेटीगाठींसोबतच मराठी मन दिवाळी अंकांसाठी उत्सूक असते. ह्याच दिवाळी अंकांचे प्रदर्शन शासकीय विभागीय ग्रंथालयात विनामूल्य सुरु आहे. दि.१० नोव्हेंबर पर्यंत हे प्रदर्शन वाचकांसाठ खुले राहणार आहे, असे छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी कळविले आहे.

समर्थ नगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रा.विष्णू सुरासे यांचे सोमवारी (दि.३) हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक प्रशांत गौतम अध्यक्षस्थानी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, ज्येष्ठ पत्रकार सुधीर सेवेकर, अण्णा वैद्य, जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाहक गुलाबराव मगर, पी.यू. जैन शाळेचे मुख्याध्यापक विजय पाटोदी हे उपस्थित होते. दिवाळी अंक केवळ मनोरंजनच करीत नसून ते विविध विषयांचे, पैलूंचे ज्ञान देणारे साहित्य असून त्यांच्या वाचनाचा आनंद हा अवर्णनीय असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रशांत गौतम यांनी केले.

प्रा. सुरासे यांनी दिवाळी अंकांचे व वाचनाचे महत्त्व विषद करून वाचन मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनणे गरजेचे असल्याचे सांगून त्यांनी याप्रसंगी हलक्या फुलक्या विनोदाने कार्यक्रमास रंगत आणली. हे प्रदर्शन विनामूल्य असून विविध विषयांवरील दिवाळी अंकरुपी फराळाचा वाचकांनी लाभ घेण्याचे आवाहन सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी केले.

या कार्यक्रमास शासकीय विभागीय ग्रंथालयाचे वाचक, सभासद तसेच शहरातील पी.यु.जैन शाळेचे शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव तर



सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथालय निरीक्षक आवजी गलांडे यांनी केले. दिवाळी अंकांचे हे प्रदर्शन दि.१० नोव्हेंबर पर्यंत कार्यालयीन वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले असून वाचनप्रेमी नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

# अभिमानाचा क्षण: आपल्या मुलींनी लिहिलेला सुवर्ण इतिहास



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भारतीय महिला क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धची रोमांचक उपांत्य फेरी जिंकल्यानंतर सर्व जगाचे लक्ष अंतिम सामन्याकडे लागले होते. सगळ्यांच्या मनात एकच विचार होता भारत विश्वचषक अंतिम सामना जिंकेल का?

रविवारी भारतीय महिला क्रिकेट संघाने अंतिम सामना जिंकून वर्ल्ड कप आपल्या नावावर केला आणि खरोखर इतिहास घडवला. याबद्दल भारतीय महिला क्रिकेट संघ, सहाय्यक कर्मचारी, खेळाडूंचे परिवार आणि सर्व महिला पूर्व खेळाडू या सर्वांचे खूप खूप अभिनंदन. जिंकल्यावर त्यांच्या डोळ्यातले आनंदाश्रू, त्यांचा भावनांनी गदगद झालेला स्वर करोडो भारतीयांना भावूक करून गेला. करोडो भारतीयांना अभिमान वाटला. मुलिंप्रमाणेच मुलांनीही हा विजय भारतभर साजरा केला. हे पाहून खरच भारत बदलला आहे हे जाणवलं. आता मुलींनी मिळवलेल्या यशाबद्दल सर्वांनाच अभिमान वाटतो हे पाहून आनंद वाटला.




शीतल गायकवाड, पुणे
(मोबाईल: 9923175624)


आपल्या विजयाच्या क्षणी बेभान न होता आपल्या खेळाडूंनी प्रतिस्पर्धी संघाजवळ जाऊन त्यांचे खचलेले मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला. ''तुमचा खेळही उत्कृष्ट झाला''हे सांगून त्यांच्या मनातील निराशा कमी करण्याचा प्रयत्न केला आणि क्रीडासंस्कारांचं सुंदर उदाहरण घालून दिलं. खूप आनंदाच्या क्षणीही दुसऱ्या टीमच्या दुःखाची जाणीव ओळखून ती कमी करण्याचा प्रयत्न केला. यातून आपल्या वाघिणींचे मन किती मोठे आहे हे दिसले. हे पाहून अक्षरशः सगळे जग स्तब्ध झाले. भारताच्या मुली कशा असल्या पाहिजेत आणि असाव्यात अगदी तशाच या साऱ्याजणी. इथपर्यंत पोहोचण्यासाठी खेळाडूंनी वर्षानुवर्षे केलेल्या मेहनतीचे सोने झाले. हजारो लाखो मुलामुलींना प्रेरणा देत राहील असा हा विजय.

या विजयातून प्रत्येकालाच बरेच काही शिकता येईल. अजूनही काही समाजघटकांमध्ये मुलींवर बंधने घालण्यात येतात. खेळणे, नृत्य, बाहेर जाणे, शिक्षण, करिअर या अनेक गोष्टींवर मर्यादा येतात. पण या विजयाने एक संदेश दिला आहे. जर मुलींना संधी आणि साथ दिली, तर त्या असामान्य कामगिरी करू शकतात.

मुलींना जर त्यांचं स्वप्नं पूर्ण करू दिले, त्यासाठी लागणारा वेळ आणि पाठींबा दिला तर त्या काय करू शकतात याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

कोणाला खेळाची आवड, कोणाला नृत्याची आवड, कोणाला गाण्याची आवड, कोणाला चित्रकलेची आवड, कोणाला स्वयंपाकाची आवड, कोणाला नोकरी करायचीय तर कोणाला व्यवसायाची आवड. त्यांना जे आवडते ते करू द्या. त्यांची स्वप्ने अर्ध्यावर मोडू नका. त्यांना पाठिंबा द्या, वेळ प्रसंगी लागेल ती मदत करा. मुलींना संधी द्या, त्या संधीचं यशात रूपांतर कसं करायचं ते त्या नक्की दाखवतील. मग पहा मुली आपलेच काय देशाचेही नाव उंचावतात.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-८४



राशीचक्रातील नववी रास 'धनु' आहे. या राशीचा स्वामी 'गुरु' आहे. या राशीचे चिन्ह धनुष्य आणि बाण (धनुष्य धारी) आहे. अग्नितत्वाची ही रास असून ज्ञान, समृद्धी आणि आशावादाचा कारक 'गुरु' यांचे हे गुण, या राशीच्या जातकांमध्ये दिसून येतात.

स्वातंत्र्य प्रेमी, आशावादी, साहसी, रोमांचक, विनोदबुद्धी, धार्मिक, तत्वनिष्ठ, धैर्यवान, महत्वाकांक्षी, सामाजिकता जपणारे असे सर्व सद्गुण असतांनाही या राशीच्या चिन्हाचा आशय पाहिला तरी 'घोडा कुठे पेंड खातोय? अपयश किंवा अडथळे का येतात?' या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे समजायला सूलभ होईल.

या राशीचे 'चिन्ह" धनुर्धारी' आहे. अर्धे घोड्याचे शरीर आणि अर्धा, मानवाच्या शरिराचा वरचा भाग ज्याने हातांमध्ये धनुष्य आणि बाण धरलेला आहे. तो बाण तो व्यक्ती सोडत असं चित्र आहे. हे चिन्ह साहस, आशावाद आणि ज्ञानाची भूक दर्शवत असावं, असं कांही जाणकारांच्या मते सांगितलं जातं.या राशीची जातकं जरा विक्षिप्तपणासाठी पण ओळखली जातात.अर्धे शरीर "हॉर्स पॉवर "चे आणि अर्धे धनुर्धारीचे अर्थात आशावादी धनुर्धारी माणसाचे आहे. प्राणी आणि मानवाच्या भावनांचा कल्लोळ या जातकांमध्ये दिसतो. त्यामुळे, यांचे वागणे कधी कधी मानवा सारखे तर कधीकधी 'अश्वा' सारखे अर्थात प्राण्यासारखे असते, यामुळे या राशीच्या जातकांना 'विक्षिप्तपणा' सारख्या मानसिकतेचा सामना करावा लागतोअर्थात

या साठी या राशीच्या जातकांनी 'वास्तुशास्त्र पेंटींग'ची मदत घेतली म्हणजे ते 'पेंटींग' त्यांच्या वास्तुन लावले तर या राशीचे नक्षत्र, मंत्राक्षरे, आराध्य वृक्ष अशा घरकां मधील सकारात्मक रंगाकार तसेच भाव यामुळे, सदर राशीच्या जातका मधील विक्षिप्त पणा कमी कमी होण्यास निश्चित पणे मदत होते जेणेकरून, उद्दीष्ये साध्य होण्यासाठी तसेच या राशीच्या व्यक्तींच्या आयुष्यातील ध्येये पूर्ण होण्यासाठी खूप मदत होईल. कारण नक्षत्राचे काही चरण, पूर्वाषाढा आणि उत्तराषाढा नक्षत्राचा सहभाग राशीमध्ये राशीमध्ये असतो. या नक्षत्रांमधील सकारात्मकतेचाच अंतर्भाव आपण "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये करतो. ज्यामुळे या जातकांना खूप मोठा दिलासा मिळू शकतो.

क्रमशः.....


द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




# जात्यावरच्या ओव्या......

काय हव नको
पगंतीला पाहतो
भाऊच्या वाडयात
दम चुलीला नसतो ||३३०||

दिवाळसणाला
पोतारल्या भिंती
देवळीत दिवा
हिचा उजेड किती!! ||३३१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# लता अजून गाते...




ज्योतिर्मय साहित्य


या पत्राला पुलंनी दिलेले उत्तर फार सुंदर आहे. ते म्हणतात की मी वयाने मोठा असल्यामुळे तुला चरणस्पर्श असे म्हणू शकत नाही. '' आणि तुझ्या लक्षावधी गीतातल्या एकाही चरणाला स्पर्श करावा असा गळा देवाने मला न देता नुसताच घसा दिला आहे. पूर्वीचे राजे मुलुख पादाक्रांत करायचे. तू तर सारे जग पदाक्रांत केले आहे. तुझे हे सार्वभौमत्व चिरकाल टिको हीच इच्छा. '' पुलंनी चरणस्पर्श जरी केला नसला तरी आपल्यासारख्या लाखो वाचकांच्या हृदयाला हृदयस्पर्श केला आहे इतके त्यांचे पत्र सुंदर आहे ! ते वाचल्यावर लताबाई आणि पुलं समोर असते तर त्यांचा चरणस्पर्श केल्याशिवाय राहवले नसते. असो. पण तो योग आता नाही.

पुलंबद्दल सुद्धा रोज काही ना काही तरी समाजमाध्यमांवर येतच असते. कोणी त्यांच्यावरील एखादा लेख टाकतो, कोणी त्यांचे एखादे पत्र प्रसारित करतो, कुठेतरी त्यांच्या बटाट्याची चाळ किंवा सुंदर मी होणार यासारख्या नाटकांचे प्रयोग सुरू असतात. कोणीतरी कुठल्यातरी कार्यक्रमात त्यांच्या पत्रांचे वाचन करत असतो. कोणीतरी अप्रकाशित पुलं कार्यक्रम सादर करतो, कोणाच्यातरी कार मध्ये पुलंच्या कथांचा ऑडिओ सुरू असतो तर कुठेतरी जीए आणि सुनीताबाईंच्या पत्रांचा वाचन सुरू असतं. लतादीदी आणि पुलं सर्वव्यापी आहेत. लतादीदी आणि पुलं यांना चिरंजीवित्वाचा वर मिळाला आहे. त्यांनी रसिकांच्या हृदयात अढळ स्थान मिळवले आहे. पुण्यात एकदा रस्त्यावर पुस्तक विक्री करणाऱ्या एका पुस्तक विक्रेत्याकडे मला पुलंचं रवींद्रनाथ: तीन व्याख्याने हे पुस्तक मिळालं. ते मला एवढं आवडलं की त्यावरून रवींद्रनाथांबद्दल अधिक जाणून घेण्याची आणि त्यांच्याबद्दल लिहिण्याची प्रेरणा मिळाली. त्यातूनच माझं आनंदयात्री रवींद्रनाथ हे पुस्तक जन्माला येतंय.



म्हणूनच म्हणतो की लता, खरं म्हणजे तू आणि पुलं म्हणजे जित्याजागत्या लिजन्ड्स आहात. रोज तुमचा कुठल्या ना कुठल्या कारणाने कुठेतरी उल्लेख होतच असतो आणि हो केवळ महाराष्ट्रातच नाही, केवळ भारतातच राहील तर पुलंच्या पत्रात म्हटल्याप्रमाणे तुम्ही दोघांनी जग पादाक्रांत केले आहे. पूर्वी मी बद्रीनाथ केदारनाथ सहल केली होती, तिथे त्या हिमालयातील उंच आणि दुर्गम शिखरांवर तुझे स्वर ऐकू येत होते. एवढेच काय पण गेल्या जूनमध्ये मी स्वित्झर्लंडला गेलो तेव्हा तेथील आल्प्स पर्वतावर देखील तुझ्या गीतांचे स्वर कानी पडले. माझा रोम रोम पुलकित झाला. मन अभिमानाने भरून आलं. माझ्यासारख्या तुमच्या भक्ताला अजून काय हवं ! तुम्ही केवळ देश नाही जोडलात, तर विविध देशातील भारतीयांना एका सूत्राने बांधून ठेवलं. एकाने सुरांनी जग जिंकलं तर दुसऱ्याने शब्दांनी !

(क्रमशः)






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# ब्रम्हपावननिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

देह मोक्षपदास कसा पोहचतो!

मी देहच आहेया द्रुढभावनेने जीव बांधलेला असतो. विवेकाने त्या बंधनातून तो मोकळा होतो. देहबुद्धी सुटन तो देहाच्या पलीकडे गेला म्हणजे तो मोक्ष पदास पोहचतो. अशा रितीने देह व देव याचा परमात्म्याला शरण जाण्याच्या पर्यन्त चा प्रवास आहे.

निर्गुण आत्मा हाच खरा मी आहे असा साक्षात अनुभव येणे म्हणजेच जन्माचे सार्थक होय. पण असा अनुभव येण्यासाठी पुन:पन: विवेकाचा ध्यास धरावा लागतो. निर्गुण निराकार परमात्म तत्वाशी एकरूप होऊन आत्मज्ञानाने स्वसंन्मानीत व्हायला हवे. स्वस्वरूपाच्या अनुसंधानात जीव तरतो.संधानाच्या मागें मागें रहाणे म्हणजे अनुसंधान होय.

स्वस्वरूप किंवा आत्मस्वरूप हे आपले संधान होय. त्याच्या सतत मागे मागे रहाणे म्हणजे अनुसंधान होय. सतत नामस्मरणात रहाणे चिंतन करणे, मनामध्ये सतत तदाकार भावनेने एकरूप होणे. सतत प्रयत्न वाढवत रहाणें. सततच्या चिंतनाने मन तदाकार होते आणि '' मी आत्मस्वरूप आहे''असा साक्षात्कार होतो.

आत्मनिवेदन –

आपण स्वतः ला स्वस्वरूपांत लीन करावे. विवेकाने अभ्यासपूर्वक आपण स्वस्वरूपाहून वेगळे उरूचं नये. स्वस्वरूपाच्या लीन होण्याच्या या अवस्थेला ''आत्मनिवेदन'' म्हणतात. प्रथम अध्यात्म श्रवण करावे. मग श्री गुरूचरणाशी सेवा करावी. ती सेवा एवढी निराभिमानी, निरंतर असावी. की परमात्मा तुमच्यात एकरूप होईल. सद्गुरूच्या सहाय्याने ''आत्मनिवेदन'' साधावे.एकदा का आत्मनिवेदन साधले गेले की निव्वळ शाश्वत आत्मवस्तु तेवढी शिल्लक रहाते. आणि मी व आत्मा एकच आहोत असे ज्ञान होते. श्रवण, निदिध्यास, मनन, साक्षात्कार ही चार पायऱ्यांची उपनिशदसिद्ध परमार्थ साधनाच श्री समर्थानी सांगितली आहे. अशाप्रकारे आत्मज्ञानाने जीव ब्रम्हस्वरूप होतो त्याचे संसारातील दु:ख नाहीसें होते. पराकोटीची साधना फलद्रुप झाल्यावर हा नश्वर देह प्रारब्धावर सोडून तो मनाने स्वस्थ रहातो. ज्ञानाची काय किंवा अज्ञानाची काय जीवनयात्रा प्रारब्धगतीने चालते. आत्मज्ञानी जीवाला तें समजते. अज्ञानी जीवाला कळत नाही. म्हणून तर ज्ञान झाल्यावर ज्ञानी जीव

(याठिकाणी मी स्त्री, व पुरूष) या अर्थाने जीव हा शब्द वापरला आहे हे वाचकांच्या लक्षात आले असेलचं. ज्ञान मिळाल्यावर जीव प्रारब्दाच्या स्वाधीन करतो. समर्थ यालाच आत्मज्ञान म्हणतात.


आत्मज्ञानाने समाधान मिळते. जीव परब्रम्हात विलीन होऊन एकरूप होतो. तो खरा भक्त बनतो. आता जे व्हायचे आहे ते होऊ दे जे जायचे आहे ते जाऊ दे,अशी मनाची निर्भय व निश्चित अवस्था होते.

जन्ममरणाचे भयच मुळी मनातून नाहिसे होते. संतांच्या संगतीचा लाभ झाला म्हणजे मुख्य देवाची ओळख होते. ती एकदा का झाली की देव व भक्त एकरूप होतात.

समास अवघड आहे मला समजला तसा मांडण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. लिखाण करत असताना काही कमीजास्त झाले तर समर्थ क्षमा करतील अशी अपेक्षा करते. वाचकांनीही समजून घ्यावे या अपेक्षेने हा

''ब्रम्हपावननिरूपण'' समास दुसरा समाप्त करते.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नामाचे त्रिकालाबाधित श्रेष्ठत्व !

ज्योतिर्मय साहित्य

नाम हे सच्चिदानंद-स्वरूप आहे. शुद्ध परमात्मस्वरूपाच्या अगदी अगदी जवळ कुणी असेल तर ते फक्त नामच होय. नाम हे चिन्मय असल्यामुळे त्याचा आनंद ओसंडून येतो आणि ही सृष्टी तयार होते. अनेक रूपे घडविणे, ती मोडणे आणि नवीन तयार करणे, पण आपण स्वत: मात्र मूळ स्वरूपाने राहणे, ही केवढी विलक्षण लीला आहे ! खरोखर, तुम्हाला मी काय सांगू ! बोलायला शिकल्यापासून आजपर्यंत मी नामाबद्दलच बोलत आहे, अजून नामाचे माहात्म्य संपत नाही. नामाचे माहात्म्य सांगून संपले तर भगवंताचे भगवंतपण लटके झाले असे समजावे. जो नामात 'मी'पणाने नाहीसा झाला त्यालाच नामाच्या माहात्म्याची कल्पना आली. असा पुरुष नामाविषयी मौन तरी धरील, कारण त्याचे माहात्म्य कोणालाच सांगता येणार नाही; किंवा शेवटच्या श्वासापर्यंत नामाचे माहात्म्यच सांगत राहील, कारण ते कितीही सांगितले तरी संपणार नाही, आणि कितीही ऐकले तरी तृप्ती होणार नाही. नामाने सर्व पापे नाहीशी होतात. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते.

नाम हे वेदांपेक्षाही श्रेष्ठ आहे. कसे ते पहा. वेदाध्ययनापासून फायदा होण्यासाठी चारी वेदांचा अभ्यास करणे जरूर आहे. त्यासाठी पुष्कळ वेळ आणि श्रम लागतात. नामाला श्रम नाहीत. दुसरे, वेदांचा अधिकार सर्व लोकांना नाही, पण नाम कुणीही घ्यावे. वेदांच्या मंत्रांचा आरंभ ॐकारानेच होतो, म्हणून वेदारंभी देखील नामच आहे. नाम हे तीर्थयात्रेपेक्षा श्रेष्ठ आहे. अंतरंगामध्ये बदल होण्यासाठी यात्रा करायची असते; पण त्याला श्रम, पैसा, प्रकृती वगैरे गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. नाम हे घरबसल्या अंतरंग बदलण्याचा अनुभव आणून देते. पंढरपूरला जाऊन नाम घेण्याचे जर न शिकला तर जाणे व्यर्थ गेले म्हणावे. नाम घ्यावे अशी बुद्धी होण्यासाठीच तिथे जाणे जरूर आहे. नाम हे सर्व सत्कर्मांचा राजा आहे. सत् म्हणजे भगवंत, त्याच्याकडे नेणारे जे कर्म तेच सत्कर्म. इतर कर्मे आडवळणाने भगवंताकडे नेतात, नाम हे साक्षात् भगवंताकडे पोहोचवते. नामाने भवरोग नाहीसा होतो. भव म्हणजे विषय. विषयांची आसक्ती असणे हा सर्व रोगांचा पाया आहे. नाम घेतल्याने भगवंताकडे प्रेम लागते आणि इतर ठिकाणची आसक्ती सुटते. नामाने सर्व दु:खे नाहीशी होतात, कारण या दु:खांचे मूळ विषयांच्या आसक्तीमध्ये आहे, आणि नामाने ती आपोआप सुटते, म्हणून दु:ख नाहीसे होते. शिवाय, भगवंत हा आनंदरूप असल्याने त्याला नामाने घट्ट धरला की दु:ख त्या ठिकाणी कसे राहू शकेल ?

प्रत्येक मनुष्याने भगवंताचे नाम घ्यावे, त्याचे ध्यान करावे, त्याच्या स्मरणात राहावे, आणि आपल्या जन्माचे सार्थक करून घ्यावे.



# शाळेची मज्जा...

अंकुश शिंगाडे, नागपूर

## सहावं वरीस धोक्याचं ?

ज्योतिर्मय साहित्य

कॉन्व्हेंटच्या शाळा आल्या. यातही काही शाळा किस्तवार शुल्क आकारुन शाळा चालवतात. काही शाळा माफक शुल्क घेतात. काही मात्र जास्त. परंतू आज ते शुल्क कमी आहे. त्यातच त्यांची एवढी जाहीरात आहे की सर्व लोकं मग ते कितीही गरीब का असेना, कॉन्व्हेंटलाच टाकतात. त्यातच तो दिवस दूर नाही की सर्व पालक आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंटला टाकतील व मराठीच्या शाळेत मुलंच मिळणार नाहीत.

महत्वपुर्ण गोष्ट ही लक्षात घेण्यासारखी आहे की आज मराठीच्या अनुदानीत शाळेत कितीही का असेना मुलं आहेत. परंतू ज्यावेळी मराठीच्या अनुदानीत शाळा बंद पडतील, त्यानंतर कॉन्व्हेंटच्या शाळेचं शुल्क एवढं भरमसाट वाढेल की गरीब लोकं आपली मुलं शिकवू शकणार नाहीत. ते आंदोलन करतील. परंतू त्याचा उपयोग होणार नाही. कारण तेव्हा वेळ निघून गेलेली असेल.

आज गरीबीचा आकडा व अनुदानीत शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचा आकडा जास्त आहे. सरकार हा आकडा कमी व्हावा यावर वेळोवेळी प्रयोग करुन प्रयत्न करीत आहे. ती बाब आपल्या लक्षात येत नाही. कारण आपण विचारशील व्यक्तीमत्वाचे असलो तर तेवढ्या चिकीत्सक विचारसरणीचे नाही. सरकारनं याच व्यापारीक विचारानं पेन्शनवर कुऱ्हाड चालवली आणि हळूच शाळेच्या अनुदानावर. ब-याच दिवसापासून नान सॅलरी ग्रँडही बंद आहे. आर टी ई चे पैसे देवू केले. परंतू कोणत्याही शाळेला मिळाले नाही. हा व्यवहारीक बदल काय दर्शवतो? ही विचार करणारी बाब आहे.

विशेष गोष्ट अशी की आज जो पालक साक्षर आहे, त्याला सरकारचं नवीन शैक्षणिक धोरण कळत जरी असलं तरी तो आपल्याला काय करायचंय असा विचार करतो. जो अज्ञानी पालक आहे, त्याला या गोष्टी कळत नाही. जो अल्पशिक्षीत आहे, परंतू त्याचेजवळ भरमसाठ पैसा आहे, तो पालक चिकीत्सक जरी असला तरी तो विचार करतो की आपल्याला काय घेणंदेणं आहे. मरणं मात्र गरीबांचंच आहे.

विशेष गोष्ट ही की वय वर्ष सहा हा शाळा प्रवेशाचा आकृतीबंध पेन्शन बंदसारखाच आकृतीबंध वाटतो. काल पेन्शनधारकांची पेन्शन बंद झाली. उद्या गरीबांच्या शाळा बंद होतील यात शंका नाही. सरकार पुरेपूर स्वरुपात खाजगीकरण करण्यासाठीच लागलं आहे. ही निर्वीवाद सत्य बाब आहे. यामुळं वेळीच सावध व्हावे. नाहीतर तेल गेलं तूप गेलं, हाती धुपाटणं आलं अशी अवस्था देशातील गरीबांची निर्माण होवू शकते. ही शक्यता नाकारता येत नाही. वय वर्ष सहा, ही विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी चांगली बाब आहे. परंतू ती बाब विचारात घेऊन सरकारनं पडद्यामागचं राजकारण करु नये. गरीबांच्या शाळा बंद करु नये म्हणजे झालं.




# कॅल्शियमची कमतरता

ज्योतिर्मय साहित्य

शरीरातील कॅल्शियम हे विटामिन डी. थायराइड ,हार्मोन्स आणि कॅल्सीटोनील याद्वारे नियंत्रित केले जाते. त्यामुळे शरीरातील व रक्ताची कॅल्शियमचे प्रमाण नेहमी योग्य राहते विटामिन डी आतड्यातील व किडनीतील कॅल्शियम रक्तामध्ये शोषून घेण्यासाठी मदत करते. आपल्या शरीराला विटामिन डी ही कोवळ्या सूर्यप्रकाशातून मिळत असते .विटामिन डी च्या कमतरतेमुळे हाडातील कॅल्शियम कमी होऊन हाडे ठिसूळ होतात. याशिवाय आहारातून कॅल्शियम युक्त पदार्थांचे सेवन न करणे, पचनशक्ती मंदावणे यामुळे आहारातील कॅल्शियमची शोषण कमी होते तसेच स्त्रियांना मासिक पाळीत अतिरिक्त स्त्राव होणे, स्त्रियांची मासिक पाळी येणे बंद झाल्यानंतर हार्मोनचे संतुलन बिघडणे व ऊन आणि शारीरिक श्रमांचा अभाव, गोड पदार्थांची अति सेवन करणे ,नवजात बालकांना मातेचे दूध न मिळणे यामुळे देखील कॅल्शियमची कमतरता निर्माण होते .प्रत्येक स्त्रीमध्ये मासिक पाळी बंद झाल्यानंतर शरीरातील हार्मोन्सची संतुलन बिघडल्याने संपूर्ण शरीरातील हाडे ठिसूळ लागतात. या दिवसांमध्ये फक्त आहारातून कॅल्शियम घेऊन पूर्तता शकत नाही त्यासाठी आयुर्वेदिक कॅल्शियमची औषधे घेणे गरजेचे असते अन्यथा स्त्रियांच्या शरीरातील हाडे ठिसूळ होऊन थोडाश्या आघाताने देखील भग्न होऊ शकतात .

अनेक स्त्रियांना हाता पायांना मुंग्या येणे, मणक्याचे विकार उद्भवणे,मान व कंबर दुखणे, सकाळी उठताना त्रास होणे, चालताना त्रास होणे ,मांडी घालून जास्त वेळ बसू न शकणे. शौचाला बसता न येणे ,चक्कर येणे, गुडघेदुखी ,लवकर थकवा येणे ,दात दुखणे, नखे ठिसूळ झाल्याने तुटणे, केस गळणे, सतत भीती वाटणे, ताण तणाव जाणवणे ,स्मरणशक्ती कमी होणे व झोप न लागणे अशा अनेक प्रकारच्या त्रासांना तोंड द्यावे लागते तथापि बहुतांश स्त्रियां त्याकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात .

स्त्रियांनी वयाच्या पन्नाशीनंतर आहारात कॅल्शियम पदार्थांचे प्रमाण वाढवावे.त्यासाठी कॅल्शियम युक्त आहाराचे सेवन करावे.पुढील पदार्थ हे कॅल्शियमयुक्त असतात. त्यांचा आहारात समावेश करावा.

गहू, बाजरी ,नाचणी, दूध व दुधाचे सर्व पदार्थ, मुगडाळ ,सोयाबीन, वाटाणे, मटकी, राजमा, कढीपत्ता, कोबी, मेथी, मुळ्याची पाने, पुदिना, कोथिंबीर ,काकडी, गवार ,टोमॅटो, मनुका, बदाम, पिस्ते, अक्रोड, खरबुजाच्या बिया, नारळ, आंबा, सिताफळ, संत्रा ,अननस ,ओवा ,जिरे, हिंग, लवंग, व काळे मिरे या पदार्थांचा आहारात समावेश असावा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

कॅल्शियम वाढण्यासाठी घरगुती उपाय

सकाळी एक ग्लास ताज्या ऊसाच्या रसामध्ये एक गुंज चुना टाकून प्यावा.

जेवणानंतर नागवेलीचे ( खायचे )पान व चुना खावा.

रात्री झोपण्यापूर्वी ऊक ग्लास दूधात गूळ टाकून प्यावा.

सुरमई माशाचे सेवन करावे.

बदाम ,सुके अंजीराचे सेवन करावे.

आहारात भेंडीच्या भाजीचे सेवन जास्त करावे.

स्वयंपाकात तीळ तेलाचा वापर करावा.

रोज आवळ्याचे सेवन करावे

एक ग्लास पाण्यात एक चमचा जिरे टाकून उकळून घ्यावे व थंड झाल्यावर सकाळी व सायंकाळी प्यावे.

बाभळीच्या बियांचे सूक्ष्म चूर्ण तूप व मधासोबत घ्यावे.

बाभळीच्या डिंकाचे चूर्ण तूप साखरेसोबत घ्यावे.

एक कप दूधात एक चमचा बडिसोप टाकून दूध उकळुन घेऊन त्यामध्ये एक चमचा बाभळीच्या डिंकाचे चूर्ण टाकून ढवळून थंड झाल्यावर घ्यावे.

वयाच्या पन्नाशी नंतर स्त्रियांना तसेच पुरुषांना देखील कॅल्शियम ची कमतरता असतेच. तथापि त्याकडे दुर्लक्ष करणे खूपच नुकसान दायक ठरू शकते. तेव्हा पन्नाशी नंतर प्रत्येक व्यक्ती ने त्यासाठी आयुर्वेद तज्ञांच्या सल्ल्याने औषधोपचार घेतल्यास वृध्दत्व सुखकर होते हे नक्कीच.




ज्योतिर्मय साहित्य

दत्तपिठातील भगव्या रंगातील पाच समाध्या डोळे कुळातील दत्तभक्तांच्या आहेत. भगवा रंग वैराग्याचे दर्शक आहे. प.पू. भाऊस्वामी आणि प.पू. बाबास्वामी यांच्यासह एकूण सात समाध्या या ठिकाणी आहेत. नंतरच्या तीन पिढ्यांना आदेश नसल्याने त्यांच्या समाध्या येथे नाहीत. सध्या नितीन उपाख्य योगिराज महाराज डोळे हे प.पू. भाऊस्वामींचे अकरावे वंशज आहेत. भारतातील नंदी नसलेले एकमेव शिवमंदिर प.पू. बाबास्वामी डोळे यांच्या समाधी मंदिराकडे नेणाऱ्या घुमटीच्या बाजूला सोमेश्वर महादेवाचे मंदिर आहे. अत्रिऋषींची पत्नी अनसूया सती जाण्याच्या वेळी भगवान शिव नंदीविना या ठिकाणी आले होते. त्यामुळे हे मंदिर भारतातील नंदी नसलेले एकमेव शिवमंदिर आहे. दत्तभक्त श्री. नितीन उपाख्य योगीराज महाराज डोळे यांचे आध्यात्मिक कार्य सद्गुरूंच्या आज्ञेने वैद्यकीय व्यवसाय बंद करून आध्यात्मिक क्षेत्रात कार्य करण्यास सूरूवात झाली. पिता आणि सद्गुरु एकच ! त्यांनी वर्ष २००८ मध्ये नितीन डोळे यांना आज्ञा केली, ''अजून किती काळ वैद्यकीय सेवा करणार ?'' मी १६ वर्षे वैद्यकीय सेवा केली. 'कोणताही पिता आपल्या पुत्राला व्यवसाय बंद कर', असे सांगणार नाही; पण 'ही आज्ञा त्यांच्या पित्याची नसून गुरूंची आज्ञा आहे', हे नितीन महाराज डोळे यांच्या लक्षात आले. मग त्यांनीं व्यवसाय हळूहळू न्यून केला. त्यांनी आध्यात्मिक क्षेत्रात काम चालू केले. संस्थानाचे काम वाढवले. एक वर्षात नितीनजींचे पिता कालवश झाले. मग त्यांच्या लक्षात आले, 'एक वर्षापूर्वी वडिलांनी त्यांना या क्षेत्रात येण्यासाठी का सूचना केली होती ?' आद्यपिठाचे महत्त्व जाणण्यासाठी नितीनजीडोळे यांचा अभ्यास वर्ष २००९ पासून संस्थानचे पूर्ण दायित्व नितीनजी डोळे यांच्यावर आले. त्या वेळी त्यांनी वैद्यकीय व्यवसाय न्यून केला होता. ते विज्ञानाचे विद्यार्थी असल्याने त्यांची जिज्ञासा अधिक होती. नितीनजींनी ठरवले, 'दत्ताचे जे आद्यपीठ आहे, ते केवळ वाडवडील म्हणतात; म्हणून नव्हे, तर आद्यपीठ म्हणजे काय ?, हे आपण शोधून काढू. त्यासाठी त्यांनी वाचन, लेखन आणि अभ्यास चालू केला.

(क्रमशः)

# बाप नावाचा वटवृक्ष

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आज एक सत्य अनुभवातून जाणवलं. प्रत्येक घरामध्ये एक कुटुंब प्रमुख, सर्वांची काळजी घेत, स्वतः च्या अडीअडचणी बाजूला ठेवून इतर सर्वांच्या गरजा भागवणारा असा व्यक्ती असतो. परंतु सर्वत्र अनुभव असा आहे की हा घरासाठी झिजणारा, घरातला प्रमुख व कर्तव्यनिष्ठ व्यक्तीच त्या घरात सर्वांना अप्रिय असतो.

घरासाठी केलेली प्रत्येक गोष्ट तो सर्वांना खुलून सांगू शकत नाही. त्याला घर पुढे नेण्यासाठी काही व्यवहार करायचे असतात. हे तो त्याच्या पद्धतीने करत असतो इतके खरे. आणि ट्रान्सपरन्सी पारदर्शकता म्हणून बोलण्यासाठी तो तोंड उघडत नाही कारण प्रत्येकाची विचार करायची पद्धत आणि स्वभाव वेगवेगळे असतात. त्यांना तोंड देऊन व्यवहार बंद पाडण्यापेक्षा तो अविश्वासाचे विष प्यायला तयार होत असतो. अनेक वेळा चूक नसतानाही स्वतः केलेले योग्य असतानाही तो अविश्वसनीय असे बोलणे, घोर अपमान सहन करून घेतो.

तो त्याच्या इतर गुणांमुळे बाहेर कितीही प्रिय असला तरी तो घरात अप्रिय असतो. तरीही हे सर्व सहन करून तो घरामध्ये जगत असतो. ते जगणे मात्र स्वतःसाठी नसून कुटुंबातील सर्वांसाठी असते. हे त्या सर्वांच्या लक्षात कां येत नाही? कधीतरी एखादी व्यक्ती त्यामध्ये समजदार भेटते, तर त्यावर इतर अविश्वास करतात. असा घरातला बाप माणूस ज्यावेळेस काही कामानिमित्त दोन-तीन दिवस बाहेरगावी जातो त्यावेळी मात्र त्याची उणीव इतरांना भासते. घरातून निघेपर्यंत त्याने सर्वांची काळजी करून काय लागते नाही लागत घरात ते सर्व आणून टाकलेले असते. तथापि या काळामध्ये इतरांमध्ये एक असुरक्षितता निर्माण होते. आणि त्याची जराशी का होईना किंमत जाणवते. मात्र काही काळच.



बलराज संघई
छत्रपती संभाजीनगर मो. 9420015108

स्वतःला कपड्यांपासून ते चप्पल बुटांपर्यंत काही आहे नाही याचा विचार न करता तो मात्र घरातील इतरांच्या औषध पेन कागदा पर्यंत पूर्ततेचा विचार प्रयत्न करत असतो. अशा दिसणाऱ्या माणसाला मात्र काय शारीरिक मानसिक त्रास आहे याचा अनेक ठिकाणी कोणीही फारसा विचार केलेला दिसत नाही. याची त्याला स्वतःला मात्र जाणीव असते. तरीही तो कधीही बोलून दाखवत नाही. मनात कुढत असताना मात्र न चुकता कर्तव्य करत असतो. अशा माणसाचे ज्यावेळेस आयुष्यभर झिजून स्वतःचा देह उगाळून शरीर कमकुवत होतं त्यावेळी देखील तो अगदी खंबीर मानसिकतेने घरातला मध्य महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणूनच राहिलेला असतो.

कुटुंबाचे व्यवस्थापन करत असताना अशा प्रमुख व्यक्तीकडून खूप काही चुकीचे कामं होत आहेत, अनावश्यक गोष्टी घडत आहेत, अमुक एका गोष्टीला त्याने महत्त्व का दिले? प्रत्येकाच्या काही प्रमुख आवश्यकता असतात, त्या त्याच्याकडून पूर्ण झाल्या नाहीत याबद्दल त्याला सर्वांकडून दूषणं दिली जातात. तथापि स्वतःच्या अनुभवा प्रमाणे तो आपल्या कुवतीने याचा योग्य अशा प्रत्येकाच्या काही गरजा पूर्ण करत असतो. अशावेळी इतरांची नाराजी पत्करून, अप्रियतेचे विष प्राशन करून सुद्धा तो कुटुंबासाठी ठामपणे उभा असतो.



खूपच अल्प ठिकाणी अशा व्यक्तीला खूप कमी घरातून सहानुभूती, आदरयुक्त मानसन्मान, पाठीवर थाप मिळताना दिसते. याकडे फारसे लक्ष न देता आपले कर्तव्यासाठी जगणे आणि नशीब असे गृहीत धरून तो चालत असतो, जगत असतो, मात्र बोलून दाखवत नसतो.

दिवसेंदिवस कालक्रमानुसार जगण्याची पद्धत, जीवनशैलीतील बदल प्रत्येकातच दिसून येत आहेत. परस्पर प्रेम, जिव्हाळा, सहृदयता संस्कार कमी होऊन भौतिकतेच्या माध्यमातून प्रत्येक जण स्वार्थासाठी धावताना दिसतो. या शर्यतीत मात्र हा बाप नावाचा माणूस संपूर्ण कुटुंबाचे ओझे पाठीवर घेऊन धापा टाकत स्वतःला पुढे नेताना दिसतो. असे चालताना तो इतरांना कधीही त्याच्या कर्तृत्वाची जाणीव करून देत नसतो. आपल्या जगण्याचा, कार्याचा अविभाज्य भाग समजून तो हा संसाराचा मानेवरचा जू ओढत असतो.

अशा बाप नावाच्या माणसाला खचल्यानंतर, थकल्यानंतर, त्याचे काम थांबल्यानंतर, शरीरावयव कमकुवत झाल्यानंतर अत्यंत कमी ठिकाणी, क्वचितच घरात आदरयुक्त सन्मानपूर्ण वागणूक मिळताना दिसते. बहुतेक ठिकाणी त्याला भार म्हणून जगणं पत्करावा लागतं. अशाच कारणाने वृद्धाश्रम भरत आहेत असे मला वाटते.

आयुष्यभर सतत कुटुंबासाठी खस्ता खाल्लेल्या, स्वतःचे संपूर्ण शरीर, अवयव झिजवून घेतलेल्या, स्वतःचा विचार कधीही न करता कुटुंबातील इतरांच्या जास्तीत जास्त गरजांची पूर्तता करणारा, घरातील एक प्रमुख मध्यस्थ स्तंभ जेव्हा थकून भागून विसावतो तेव्हा त्याला आदर युक्त मान सन्मान मिळावा अशी या ठिकाणी अपेक्षा आहे. आयुष्यभर ओझे वाहून घेतलेले दुखलेले, घट्टे पडलेले खांदे कधी कोणीतरी मायेने चोळावेत अशा भावयुक्त अश्वस्त नजरेने तो सर्वांकडे पाहत असतो. घरात एक वटवृक्ष आहे, आणि आपण सर्वजण त्याच्या छायेमध्ये विसावलो आहोत, सुरक्षित आहोत असे उदात्त विचार खूप कमी ठिकाणी दिसतात.

असा मायेची सावली देणारा, अवहेलना झेलत स्वभाव न सोडणारा, संकटरुपी ऊन, वारा, पावसास झेलून शितल छाया देणारा, सर्व आघात सहन करून फक्त फळं पदरात टाकणारा, अखेरपर्यंत ही सावली देण्यासाठी पाळे-मुळे घट्ट गाढून ठेवणारा, सुकलेली पानं आणि वाळलेल्या फांद्या गळून पडल्याचं दुःख न बाळगणारा, असा कल्पवृक्ष, वटवृक्ष, बाप नावाचा माणूस प्रत्येक घरात असतो आणि कर्तुत्वाची, झिजण्याची, परोपकाराची, जाणीव न करून देता जातो. असा वृक्ष अखेर थकून स्थिरावला असेपर्यंत त्याची आदरयुक्त अर्चना व्हावी हाच उद्देश.

# आई मुलाच्या नात्याची आजची गोष्ट सांगणाऱ्या उत्तरचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

प्रत्येक माणसाचं जन्माच्या आधीपासूनही जे नातं जुळतं ते आपल्या आईशी! जन्मानंतर रूढार्थानं त्याची- आईची नाळ कापली जाते पण तरी ती नाळ आयुष्यभर जोडलीच राहते. जननी, गुरू, अन्नदात्री, सखी, प्रेरणास्रोत अशा विविध भूमिका ती आपल्या मुलांच्या आयुष्यात निभावत राहते. या कित्येक भूमिका बजावत ती लेकराबरोबर प्रत्यक्ष साथ करत राहते. तर कधी सावली होऊन त्याच्या सतत मागे असते. कारण आपल्या लेकराचं भलं कशात हे फक्त आईलाच माहीत असतं! अशीच आई- मुलाच्या नात्याची आजच्या परिभाषेतली संवेदनशील गोष्ट सांगणाऱ्या उत्तर या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे.

झी स्टुडिओज आणि जॅकपॉट एंटरटेनमेंट ची निर्मिती असलेल्या या चित्रपटाद्वारे सुप्रसिद्ध लेखक क्षितिज पटवर्धन दिग्दर्शकीय पदार्पण  करतोय हे विशेष. 'उत्तर' या अत्यंत संवेदनशील विषयावरील चित्रपटात गुणी आणि चोखंदळ अभिनेत्री रेणुका शहाणे आईच्या भूमिकेत आहे तर अभिनय बेर्डे मुलाच्या भूमिकेत आहे. ऋता दुर्गुळेची सुद्धा यात महत्त्वाची भूमिका आहे. प्रत्येक घराची,




नि घरातल्या प्रत्येक मुलांची, तरीही आई- मुलाच्या लडिवाळ नात्याची ही आगळीवेगळी गोष्ट नेमकी आहे तरी काय, याचं 'उत्तर' रसिकांना येत्या १२ डिसेंबरला रूपेरी पडद्यावर पाहायला मिळणार आहे.

तंत्रज्ञानाच्या या युगात संवादाची साधने जरी वाढली असली तरी माणसांचा आपआपसांतील संवाद कमी होत चालल्याची चिंता आपण अनेकदा व्यक्त करतो. उत्तरच्या टिझरमध्येही अशाच प्रकारचा आई मुलामधला संवाद बघायला मिळतोय. कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलासोबत आईचा फोनवरील खुमासदार संवाद यात ऐकायला मिळतो. ज्यात आईच्या  काळजीच्या प्रश्नांना कंटाळलेला मुलगा फोन ठेवू का ? असं विचारतो त्यावर ''इनकमिंगला पैसे पडल्यासारखा बोलतोस'' अशी आईची प्रतिक्रिया पण दिसते. थोडक्यात, फास्ट फुड, फास्ट वाय फाय, सगळं काही इन्स्टंट, रेडिमेड हवं, असा विचार करणाऱ्या आजच्या पिढीला थोडा ठहराव देणाऱ्या आईची ही गोष्ट असावी, असा अंदाज टिझरवरून येत आहे.

झी स्टुडिओजसोबत आजवर डबलसीट, फास्टर फेणे, धुरळा सारख्या सुपरहिट चित्रपटांचं लेखन करणाऱ्या शिवाय हिंदीमध्येही सिंघम २ सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटाचं आणि तालीसारख्या संवदेनशील वेबसिरीजचं लेखन करणाऱ्या क्षितिज पटवर्धनने या चित्रपटाची कथा-पटकथा लिहिली असून या चित्रपटाद्वारे तो दिग्दर्शनात पदार्पण करतोय हे विशेष. उत्तर बद्दल बोलताना तो म्हणाला की, '' आई हे सगळ्यात गृहीत धरलेलं, त्यामुळेच जवळचं असूनही दुर्लक्ष होणारं नातं आहे. तिचा फक्त व्यक्ती म्हणून विचार करणारी आणि आई आणि मूल या नात्याचा नव्याने विचार करायला लावणारी कलाकृती करायची, यातून उत्तर हा सिनेमा जन्माला आला.''

तर झी स्टुडिओज मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणाले की, उत्तर चित्रपटाची गोष्ट क्षितिजने ऐकवली तेव्हाच त्या विषयाची ताकद आमच्या लक्षात आली होती. आई आणि मुलाच्या नात्यावर भाष्य करणारी, ही आजच्या पिढीची गोष्ट प्रत्येक प्रेक्षकाला भावणारी आहे. हा चित्रपट मराठी भाषेतला असला तरी यातील भावना ही वैश्विक आहे आणि ती प्रत्येकाला आपलीशी वाटावी अशीच आहे.''

झी स्टुडिओजचे उमेशकुमार बन्सल आणि बवेश जानवलेकर व जॅकपॉट एंटरटेनमेंटचे मयूर हरदास आणि संपदा वाघ  यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून येत्या १२ डिसेंबरला झी स्टुडिओजच्या माध्यमातून हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

***

# बालमनात जपलेला स्वराज्यदीप



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

दिवाळी जवळ आली की दरवर्षी मनात एक वेगळीच उत्सुकता दाटते. फराळाच्या चविष्ट गंधात, दिव्यांच्या रोषणाईत, खरेदीच्या उत्साहात एक गोष्ट मात्र मला खास आनंद देणारी असते, ती म्हणजे मुलांसोबत अंगणात मातीचा किल्ला उभारणं. माझ्यासाठी हा क्षण म्हणजे इतिहासाच्या गर्भात डोकावून पाहण्याची एक सुवर्णसंधीच.



मंगेश दौंडकर,
पुणे, मो.- 9890619354

गेल्या अनेक वर्षांपासून मुलांना सोबत घेऊन मी हा उपक्रम राबवत आहे. माती, दगड, झाडाच्या फांद्या, थोडंसं कागदाचं जग आणि चिमुकल्यांच्या कल्पनाशक्तीचं आकाश... यातून उभा राहतो एक स्वप्नमय किल्ला आणि त्या किल्ल्याच्या तटबंदीबरोबरच उभं राहतं शिवस्वराज्याचं भव्य दिव्य रूप.

आजचा काळ प्रचंड वेगाने बदलतो आहे. एकेकाळी मातीत खेळणारी मुलं आज स्क्रीनमध्ये व्यस्त आहेत. त्यांना जगभरातल्या गोष्टी ज्ञात आहेत, पण आपल्या मातीतले गड, शिवरायांचे कार्य आणि त्यांच्या शिस्तबद्ध स्वराज्याचं स्वप्न मात्र धूसर होत चाललंय. हे चित्र थोडंसं अस्वस्थ करणारं आहे. याच भावनेतून त्यांना सोबत घेऊन मी या छोट्यांच्या विश्वात उतरतो.

गड म्हणजे फक्त दगडधोंड्यांचा डोंगर नव्हे तर गड म्हणजे त्याग, शौर्य आणि आत्मसन्मानाची गाथा. सह्याद्रीच्या कुशीत छत्रपतींनी उभारलेला प्रत्येक किल्ला हा जनतेच्या मनात त्यांनी निर्माण केलेल्या अढळ विश्वासाचा साक्षीदार होता. मुलांना हे सांगताना मी त्या गडामागचा इतिहास सांगतो. रायगड उभा करतो, तेव्हा त्यांच्या डोळ्यासमोर राज्याभिषेकाचा सोहळा खुलतो. सिंहगड उभारताना तानाजीचं स्वराज्यासाठीचं बलिदान त्यांच्या काळजाला भिडतं. आणि मग त्या चमकणाऱ्या डोळ्यांत दिसतं खरं दिवाळीचं समाधान!

गडाचा बुरुज आकार घेऊ लागतो तसं त्यांच्या मनात कुतूहल दाटतं. ''गड इतका उंच का?'', ''मावळे कुठे राहायचे?'', ''महाराज या गडावर आले असतील का?'' अशा निरागस प्रश्नांतून त्यांची जिज्ञासा उफाळून येते. सगळ्यात महत्त्वाचं, त्यांना वाटतं की इतिहास ही केवळ पाठ करण्याची नव्हे, तर ती अनुभवण्याची, समजून घेण्याची गोष्ट आहे.

किल्ला बनवताना त्यांचे हात चिखलाने माखतात, कधी ठेच लागते, काही वेळा बुरुज ढासळतो. पण ही प्रक्रिया त्यांना शिकवते - चिकाटी, संयम आणि श्रमाची किंमत. मुलांमध्ये नेतृत्वगुण, कल्पकता आणि सहकार्याची भावना निर्माण होते. शिकणं केवळ पुस्तकांतच नसतं, हे त्यांना स्वतःच्या अनुभवातून उमगायला लागतं.

पालक म्हणून आपली भूमिका यामध्ये फार महत्त्वाची आहे. आज अनेक पालक ''वेळ नाही'', ''अभ्यासाकडे दुर्लक्ष नको'' म्हणून अशा उपक्रमांपासून मुलांना दूर ठेवतात. पण हे विसरून चालणार नाही की जीवनात खरी समज, मूल्यं आणि ओळख हे अनुभवांतूनच येतात. अभ्यास जितका आवश्यक आहे, तितकंच आवश्यक आहे आपल्या मातीशी नाळ जोडणं.

काळ बदलतो आहे. आजची पिढी रोबोटिक्स, , कोडिंग शिकते आहे आणि ते हवंच. पण प्रगतीच्या वाटेवरून चालताना, पायाखालची माती विसरली जाऊ नये. गडकोट म्हणजे या मातीचा भक्कम आधार. त्यांत आपला इतिहास आहे, आपला अभिमान आहे आणि आपली खरी ओळख आहे. म्हणूनच गड उभा राहायला हवा - फक्त अंगणात नाही, तर मुलांच्या मनातही.

किल्ला पूर्ण झाल्यावर इवल्याश्या हाताने ही मुलं किल्ल्यावर भगवा रोवतात, त्याक्षणी माझं हृदय अभिमानाने भरून येतं. तो एक विजय असतो, हरवलेलं बालपण गवसल्याचा आणि पालकत्त्वाच्या सार्थकतेचाही. दिवाळीच्या दिव्यांप्रमाणेच त्यांच्या मनातही स्वाभिमानाचा आणि इतिहासप्रेमाचा एक दिवा अखंड तेवत राहावा... हीच माझी दरवर्षीची प्रामाणिक इच्छा.









# श्रेष्ठ शिखांचे गुरु - गुरु नानक

**ज्योतिर्मय साहित्य**

मित्रांनो आज ०५ नोव्हेंबर, गुरुनानक जयंती आहे. शीख धर्माचे संस्थापक आणि शिखांचे पहिले गुरु म्हणजे गुरू नानक देव होत. गुरूनानक यांनी समानता, प्रेम भाव आणि कायम भक्तीचा संदेश दिला. गुरू नानक यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी तलवंडी नावाच्या गावात झाला, जे पाकिस्तानमधील ननकाना साहिब म्हणून ओळखले जाते.

गुरूनानक यांचे वडील मेहता कालू हे पटवारी होते आणि त्यांची आई तृप्ता होती. त्यांना बीबी नानकी नावाची एक मोठी बहीण होती. गुरू नानक यांनी भारत आणि इतर देशांमध्ये प्रचंड प्रवास केला, लोकांना आध्यात्मिक, सामाजिक एकता, शांतता आणि सौहार्दाचे म्हणजे व स्नेह, मैत्री, जिव्हाळा आणि नम्रतेने राहण्याचे ज्ञान दिले.

आपल्या प्रवासाच्या शेवटी, ते करतारपूर (सध्या पाकिस्तानात) येथे स्थायिक झाले, जिथे त्यांनी एक समुदाय स्थापन केला आणि आपले उपदेश देणे सुरू ठेवले, २२ सप्टेंबर १५३९ रोजी करतारपूर येथे त्यांनी देह ठेवला.


गुरू नानक यांच्या शिकवणीचा मुख्य भर एकाच ईश्वरावर विश्वास ठेवणे आणि सर्व मानवजातीमध्ये समानता राखणे हा होता. त्यांच्या तीन मुख्य शिकवणी खालीलप्रमाणे आहेत, ज्यांना तीन सुवर्ण नियम देखील म्हणतात:

१) नाम जपो : सर्वांनी देवाच्या नावाचे स्मरण आणि ध्यान करणे.

२) किरत करो : प्रामाणिकपणे आणि मेहनतीने जीवन जगणे, आणि आपले काम करणे.

३) वंड छको: इतरांशी वाटून घेणे आणि गरजूंची सेवा करणे.

त्यांच्या आयुष्यात कठीण प्रसंग



म्हणजे सच्चा सौदा (व्यापार), एकदा त्यांच्या वडिलांनी त्यांना व्यापार करण्यासाठी आपल्या एका मित्रासोबत २० रुपये देऊन पाठविले होते, खरं तर गुरु नानक यांना संसारात, व्यापारात मुळीच रस नव्हता, तेंव्हा त्यांनी ते पैसे रस्त्यात एका भुकेल्या गरजुला जेवणासाठी देऊन टाकले, यावरून त्यांच्या अध्यात्मिक आणि सामाजिक भावनेची, प्रेम भावनेची झलक वयाच्या २० व्या वर्षीच दिसली.

असे हे श्रेष्ठ शिखांचे गुरु, गुरु नानक यांचे सामाजिक योगदान खूप मोठे आहे. त्यांनी जात-पात, उच्च-नीच आणि धार्मिक भेदभावाचा तीव्रपणे विरोध केला आणि सर्वांना समानतेने वागवण्याचा संदेश दिला. त्यांनी महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि समाजात त्यांना योग्य सन्मान मिळवून देण्याचे समर्थन केले.

गुरूनानक यांचे उपदेश आणि भजने नंतर शीखांच्या पवित्र धर्मग्रंथ गुरू ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट करण्यात आली. आज गुरू नानक जयंती आहे. ज्याला प्रकाश पर्व असेही म्हणतात. हा सण दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला जगभरातील शीख



गिरीश खं.वसेकर (देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे मो.९४२२६५९४००

समुदायाद्वारे मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केल्या जातो.

१) या दिवशी गुरुद्वारांना सुंदर रीत्या सजवले जाते. आणि सुशोभित केल्या जाते.

२) येथे अखंड असे पवित्र पाठ केले जातात आणि शिखांच्या पवित्र ग्रंथांचे वाचन केल्या जाते.

३) याच दिवशी पवित्र भजन आणि कीर्तन ही सादर करण्यात येत असते.

४) या दिवशी गुरुद्वारा मध्ये लंगर ही मोठ्या प्रमाणात असते आणि गरजू लोकांना आणि भक्तांना मोफत जेवणाची व्यवस्था केल्या जाते.

गुरु नानक जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या आदर्श शिकवणींना स्मरून करून त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केल्या जातो. आज या गुरूनानक जयंती निमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन.

# मित्र-मैत्रीच्या मुदत ठेवी-एफडीआरएस

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार मित्र हो- आयुष्यातल्या प्रत्येक वळणावर आपल्याला मित्र भेटतात. सहजपणे सूर जुळतात ,अशा मित्रांशी मैत्रीचे धागे अधिक घट्ट विणले जातात .''मित्र नावाच्या माणसांनी सर्वांचेच आयुष्य व्यापलेले आहे''. एका मित्राच्या पारिवारिक समारंभात एकत्र आलेल्या मित्रांमुळे '' मैत्री आणि मित्र याविषयी व्यक्त होण्यासाठी निमित्त मिळाले आहे . सोबत असलेल्या फोटोत दिसणारे सर्वश्री १.सुभाष काळे, २. प्रभुणे, ३.भास्कर देगलूरकर, ४.अभय कोकीळ, ५. अशोक कुलकर्णी, ६. किरण आचलेरकर. हे आम्ही सारे मित्र स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या बँकेत होतो. या मित्रांविषयी थोडेसे : १.सुभाष काळे हा माझा १० वी-अकरावीचा वर्गमित्र गव्हर्नमेंट हायस्कुल काचीगुडा - हैद्राबाद '' मधून १९६७ साली आम्ही एचएससी झालोत.



१९७३ मध्ये मी, १९७५ मध्ये सुभाष हैद्राबाद बँकेत लागलो. १९९५ ते २००० या दरम्यान परभणी येथे कृषी विकास शाखा, आणि कृषी विद्यापीठ शाखेत आम्ही सोबत काम केले. पूढे सुभाष ऑफिसर झाला ,अनेक ठिकाणी त्याने काम केले. मुलुंड-मुंबई ब्रँच मॅनेजर ''असतांना तो सेवानिवृत्त होऊन माझ्यासारखा ''पुणेकर''झाला.

श्री प्रभुणे परभणीच्या वास्तव्यात आमची मैत्री कायम राहिली, हे देखील ''पुणेकर''झालेत. श्री भास्कर(महाराज) देगलूरकर ऑफिसर म्हणून बदलून आले. कॉलनीतील बी.के. संगरेड्डीकर यांच्या ''राजस'' बंगल्यात राहिले, श्रीरामनगर मधील त्यांच्या सहवासाने माझ्या लेखनाला आध्यात्मिक स्पर्श झाला ही माझी भावना.

मित्र हो-

१९८६ मध्ये मी परतूरहुन परभणीच्या कृषी विकास शाखेत हेड-क्लर्क म्हणून रुजू झालो, इथेच परम-मित्र श्रेणीत फिट्ट बसणारा अभय कोकीळ भेटला. माझ्या हौसिंग लोनचे प्रपोजल त्यानेच अचूक भरून दिले, त्याच्या पांढऱ्या-शुभ्र स्कुटरवर अनेक वेळा मी बँकेत गेलो, त्यानेच मला ''चल मेरी लुना'', म्हणायला शिकवले. मितभाषी अभय एक उत्कृष्ट वाचक आहे '' तो माझ्या साहित्याचा वाचक असणे '' माझ्यासाठी आमच्या मैत्रीचे रसाळ फळ आहे. हा ही पुणेकर झालाय. अशोक कुलकर्णी '' अतिशय बुद्धीमंत आहे '' हे ठामपणे सांगू शकण्याचे कारण १९७४-७५ मध्ये अंबाजोगाई येथे आम्ही एकाच बिल्डिंग मध्ये राहण्यास होतो. मी बँकेत नुकताच लागलेला, अशोक कुलकर्णी बीएससी साठी योगेश्वरी महाविद्यालयात शिकत होते. तेंव्हाच हा मित्र पुढे हैद्राबाद बँकेत अतिशय कर्तबगार अधिकारी म्हणून लौकीकप्राप्त झाला''. परभणी मुख्य शाखेतील यांची कारकीर्द उल्लेखनीय ठरली, आमची जुनी मैत्री नवी झाली. हे ही आता पुणे-निवासी आहेत. १९९०च्या दशकात बँकेत कम्प्युटर- तंत्र सुरू झाले. या कामात अतिशय तरबेज असणारे आणि इतरांना हे नवे तंत्रज्ञान मनापासून शिकवणारे सद्गृहस्थ म्हणजे फोटोतील दाढीधारी प्रसन्न व्यक्तिमत्व किरण आचलेरकर. परभणी मुख्य शाखेत असताना भेट व्हायची. ती ओळख मैत्री कायम आहे. आमच्या भेटीचे निमित्त कोणते, हे ही सांगतो मित्रांनो- सर्वप्रिय सहकारी मित्र, माझे कॉलनीमेट,बालमित्र श्री. गजानन सदाशिव उर्फ गजाभाऊ देशमुख यांच्या अमृतमहोत्सवी पारिवारिक समारंभात पुण्यात या मित्रांची भेट झाली.या भेटीचे क्रेडिट गजाभाऊंना, म्हणून त्यांना थँक्स म्हणतो.


# श्री महावतार बाबाजींच्या कार्याची महती सांगणारा फकिरीयत

**ज्योतिर्मय साहित्य**

क्रियायोगाचे प्रणेते श्री महावतार बाबाजी जे हजारो वर्षांपासून हिमालयाच्या पावन धरतीवर संचार करीत आहेत अशा रहस्यमय हिमालयीन योग्याची भेट आपल्याला फकिरीयत या आगामी हिंदी चित्रपटात घडणार आहे. आध्यात्म, गुरूभक्ती, क्रियायोग आणि श्रद्धा यांची प्रचिती देणाऱ्या गुरूमाई माँ रुद्रात्मिका यांच्या आध्यात्मिक प्रवासावर हा चित्रपट आधारलेला आहे. या हिंदी चित्रपटाच्या रूपात श्री महावतार बाबाजी, श्री रामकृष्ण परमहंस, श्री स्वामी समर्थ, श्री शंकर महाराज, बाबा श्री कालभैरव, बाबा श्री भद्रबाहू, हेडाखान बाबा, माँ काली यांचे दर्शन आणि यासोबतच गुरुमाई माँ रुद्रात्मिका यांचा त्यांच्या गुरु कार्यासाठीचा संघर्ष पाहायला मिळणार आहे. २८ नोव्हेंबर रोजी फकिरीयत प्रदर्शित होणार आहे.

फकिरीयत चित्रपटाची निर्मिती भद्रबाहू डिव्हाइन क्रिएशन्स एलएलपीच्या बॅनरखाली करण्यात आली आहे. दिग्दर्शक संतोष मांजरेकर यांनी फकिरीयतचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची कथा 'चिरुट जलती है' आणि 'अध्यात्म एक विद्रोह, एक क्रांती' या श्री गुरुमाई यांनी लिहिलेल्या पुस्तकांवर आधारलेली आहे. पटकथालेखन अनिल पवार यांनी केले असून, अनिल पवार यांनीच श्री गुरुमाई यांच्यासोबत संवादलेखनही केले आहे. श्री महावतार बाबाजींची शिकवण, त्यांचे विचार, त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांची अनुभूती फकिरीयत चित्रपट पाहिल्यावर येणार असून, ही केवळ बाबाजींच्या महतीची आध्यात्मिक वाटचाल नसून, त्यांच्या शिष्येला द्याव्या लागलेल्या संघर्षाची गाथाही आहे. हा चित्रपट संगीतप्रेमींसाठी आध्यात्मिक गीत-संगीताची अनोखी मेजवानी घेऊन आला आहे. संतविचारांना सुमधूर संगीताची सुरेल जोड देण्यात आली आहे. चलो चले हम बाबाजी के देस..., गुरु मै तेरे शरण..., इतना गुरुर मत कर... ही या चित्रपटातील गाणी मनामनांत भक्तीभावाची ज्योत प्रज्वलित करणारी आहेत.

गुरूमाई रुद्रात्मिका यांना या कलाकृतीच्या माध्यमातून सांगायचे आहे की बाबाजी आणि या चित्रपटात दाखवलेले सर्व महात्मा इतके सक्षम आणि सर्वशक्तिमान आहेत की त्यांच्या इच्छेशिवाय आपण त्यांच्या नावाने काहीही करू शकत नाही. या चित्रपटाचे आदेश त्यांच्याकडून मिळाले होते




आणि म्हणूनच हे सर्व शक्य झाले. बाबा भद्रबाहू आणि बाबाजींनी सांगितलेल्या गोष्टी या चित्रपटात संवादांच्या स्वरूपात दाखवल्या आहेत. फकिरीयत हे नाव देखील त्यांच्याच आदेशावरून देण्यात आले आहे. हे सर्व संत आणि महात्मे जात, धर्म, देव, देश याच्या पलीकडे आहेत. आपण भाषा आणि पोशाख यांना धर्म समजतो, पण फकीरियत ही एक वृत्ती आहे आणि ही वृत्ती ज्ञान, महानता, त्याग दर्शवते. सर्व ज्ञान आणि दैवी शक्ती असूनही, या महान आत्म्यांना कोणत्याही गोष्टीची आसक्ती नाही. हीच फकीरियत आहे. हीच त्यागाची वृत्ती आहे. हीच या महान आत्म्यांची महानता आहे.

संत विचारांचा अनमोल नजराणा घेऊन आलेल्या फकिरीयतमध्ये दीपा परब, उदय टिक्कर, संदेश जाधव, विनीत शर्मा, अक्षय वर्तक, नयन जाधव, संदेश जाधव, अनीषा सबनीस आदी कलाकारांनी विविध व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. याखेरीज अभिनेता संतोष जुवेकर पाहुण्या भूमिकेत दिसणार आहे. मनीष राजगिरे, मनोज मिश्रा, जसराज जोशी, नेहा राजपाल या गायकांच्या आवाजात संगीतकार प्रवीण कुंवर यांनी गीतकार समृद्धी पवार यांनी लिहिलेल्या गीतांना संगीतसाज चढवला आहे. संकलन निलेश गावंड यांनी केले असून, डिओपी अजित रेड्डी यांनी सिनेमॅटोग्राफी केली आहे.

# मागणे इतुकेची आहे..

**ज्योतिर्मय साहित्य**

अलीकडे दूरदर्शन, वर्तमानपत्र एकूण सगळ्याच समाज माध्यमातून खूप विचित्र बातम्या कानावर येतात.. उदा.: बापाने मुलाला टीव्ही बघताना डोळ्यात ड्रॉप्स घालायला सांगितले म्हणून त्याने रागाने बापाच्या चेहऱ्यावर वार केले, शेजाऱ्यांनी जोरात फटाके वाजवले म्हणून दोन्हीं घरातील लोकांचे जोरात भांडण झाले त्यात अनेक लोक जखमी, एका मुलीने लग्न करायला नकार दिला म्हणून तिचा खून करून तिच्या आईला जाऊन त्या मुलाने स्वतः सांगितले.. हे सगळे ऐकताना, वाचताना, बघताना वाटते की कुठे हरवत चालला आहे समजूतदारपणा? सहनशीलता तर कुठेच दिसत नाही. माझेच बरोबर आहे ही हेकट भावना, कोणाचेही न ऐकण्याची प्रवृत्ती, अती स्वार्थ यामुळे कुटुंब, समाज सगळीकडचीच शांतता, समाधान हरवत चालले आहे.



सौ.माधुरी म.इनामदार
मिरज. मो. 78755 99497

या सगळ्याला अजून कारण आहे असे मला वाटते. मिळणारा पैसा, सहज मिळणाऱ्या सगळ्या सुखसोयी, आसपासची संगत, टीव्ही सीरियल, काही चित्रपट या मधूनही होणारे चुकीचे दर्शन, मुलामुलींचे प्रचंड लाड अशा अनेक कारणांमुळे मायेचा ओलावा पूर्ण सुकत चालला आहे. आमचे तुमच्यामुळे काही अडत नाही पैसे फेकले की सगळे मिळते ही भावना प्रबळ होतीय. (या सगळ्याला अपवाद नक्कीच आहेत)

मराठीत जाणीव नावाचा एक शब्द आणि त्या मागची भावना मला नेहमीच लाख मोलाची वाटत आली आहे. मग ती देव, प्राणी, पक्षी, निसर्ग माणसे, नाती अगदी कोणाबद्दल ही असू देत.. या सगळ्यांनी आपल्याला किती भरभरून दिले मग ते शक्ती, भक्ती, प्रेम, पैसा, आनंद, आधार कोणत्याही स्वरूपात असो त्याची जाणीव असेल तर कृतज्ञता असते आणि जिथे कृतज्ञता असते तिथे प्रेम आणि आदर आणि त्यामधील चिवट बंध तुटू शकत नाही. पण दुर्दैवाने आता ही भावनाच नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

त्यामुळे माझे मागणे इतुकेची आहे की माणसाच्या मनाचा तरी दगड होण्यापासून वाचू देत. त्याला चांगुलपणाची जाणीव होऊ देत. तर आणि तरच हे जग सुंदर आणि परिपूर्ण होईल. हो ना?

****

# गुरू नानक देव

**ज्योतिर्मय साहित्य**

आज कार्तिक पौर्णिमा, आज शीख समुदायाचे लोक श्री गुरू नानक देवजी यांचा जन्मोत्सव साजरा करतात. वास्तविक श्री गुरु नानक देवजी यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी झाला मात्र शीख धर्माचे अनुयायी त्यांचा जन्मोत्सव कार्तिक पौर्णिमेलाच साजरा करतात. गुरू नानक देवजी हे शीख धर्माचे संस्थापक व पहिले गुरु होते. गुरू नानक देवजी यांचा जन्म पाकिस्तानातील लाहोर जवळील तलवंडी येथे एका हिंदू कुटुंबात झाला. आजही या गावाला नानकना साहिब असे म्हणतात. गुरू नानक यांचा जन्मोत्सव प्रकाश पर्व म्हणूनही साजरा केला जातो. गुरू नानक देव लहानपापासूनच धार्मिक वृत्तीचे होते मात्र कर्मकांड आणि बुरसटलेले विचार त्यांना मान्य नव्हते म्हणूनच त्यांनी मौजीबंधनाच्यावेळीच जानवे घालण्यास नकार दिला होता होता. हिंदू धर्मातील कर्मकांड, बुरसटलेले विचार, अनिष्ट चालीरीती, विषमता, जातीभेद, स्त्रियांना दिली जाणारी हिन वागणूक त्यांना मान्य नव्हती म्हणूनच ज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी शीख धर्माची स्थापना केली. शीख धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी जगभर यात्रा काढली. या दरम्यान त्यांनी जगभरातील अनेक धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या. त्यांनी त्या काळात



केवळ भारतातीलच धार्मिक स्थळांना नव्हे तर इराक मधील बगदाद आणि सौदी अरेबियातील मक्का मदिना या धार्मिक स्थळांनाही भेटी दिल्या. या दरम्यान त्यांनी शीख धर्माच्या तत्वांचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्यांमध्ये देव आणि धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेशही दिला. त्यांनी स्थापन केलेला शीख धर्म उदात्त, समतेच्या शिकवणुकीमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात रुजला. आज शीख धर्माचे अनुयायी केवळ आशिया खंडातच नाही तर युरोप आणि अमेरिका खंडातही आहे. जगातील प्रमुख धर्मा पैकी एक धर्म म्हणून शीख धर्म ओळखला जातो. गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य आणि शाश्वत मूल्यांचे मूळ होते म्हणूनच जात धर्म यापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे, माणूस म्हणून एकत्र राहावे अशी त्यांची इच्छा होती. सर्व माणसे ही एकाच आईची लेकरे असून त्यांच्यात कोणीही उच्च नीच नाही असे ते मानत. जातीपाती मधील धर्मा धर्मामधील भेदभाव तर मान्य नव्हता. कोणीही हिंदू नाही, कोणीही मुसलमान नाही सर्व जण मानव आहोत असा नारा त्यांनी दिला. त्यांनी एकता, श्रद्धा आणि प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारक विचारांचे होते. त्यांच्या विचारांमुळेच शीख धर्म साता समुद्रापार गेला. ७ सप्टेंबर १५३९ रोजी श्री गुरु नानक देवजी यांचे महानिर्वाण झाले. गुरू नानक देवजी यांना त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559